
Peer Reviewed Referred and UGC Listed Journal (Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume - IX, Issue - I
January - March - 2020
Marathi Part - II



Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - I January - March - 2020

MARATHI PART - II

**Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"AJANTA"**.

Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)
**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)
Cell No. : 9579260877, 9822620877, 7030308239 Ph. No. : (0240) 2400877

E-mail : ajanta5050@gmail.com, www.ajantaprakashan.com

**AJANTA - ISSN 2277 - 5730 - Impact Factor - 6.399** (www.sjifactor.com)

# EDITORIAL BOARD


**Professor Kaiser Haq**
Dept. of English, University of Dhaka,
Dhaka 1000, Bangladesh.

**Roderick McCulloch**
University of the Sunshine Coast,
Locked Bag 4, Maroochydore DC,
Queensland, 4558 Australia.

**Dr. Ashaf Fetoh Eata**
College of Art's and Science
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

**Dr. Nicholas Loannides**
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,
Faculty of Computing, North Campus,
London Metropolitan University, 166-220 Holloway Road,
London, N7 8DB, UK.

**Muhammad Mezbah-ul-Islam**
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

**Dr. Meenu Maheshwari**
Assit. Prof. & Former Head Dept.
of Commerce & Management
University of Kota, Kota.

**Dr. S. Sampath**
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

**Dr. D. H. Malini Srinivasa Rao**
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University
Karaikal - 609605.

**Dr. S. K. Omanwar**
Professor and Head, Physics,
Sat Gadge Baba Amravati
University, Amravati.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean, School for Environmental
Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar
University Raebareily Road, Lucknow.

**Dr. Shekhar Gungurwar**
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

**Memon Sohel Md Yusuf**
Dept. of Commerece, Nirzwa College
of Technology, Nizwa Oman.

**Dr. S. Karunanidhi**
Professor & Head,
Dept. of Psychology,
University of Madras.

**Prof. Joyanta Borbora**
Head Dept. of Sociology,
University, Dibrugarh.

**Dr. Walmik Sarwade**
HOD Dept. of Commerce
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad.

**Dr. Manoj Dixit**
Professor and Head,
Department of Public Administration Director,
Institute of Tourism Studies,
Lucknow University, Lucknow.

**Prof. P. T. Srinivasan**
Professor and Head,
Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

**Dr. P. Vitthal**
School of Language and Literature
Marathi Dept. Swami Ramanand
Teerth Marathwada University, Nanded.

# EDITORIAL BOARD

**Dr. Jagdish R. Baheti**
H.O.D. S. N. J. B. College of Pharmacy,
Meminagar, A/P. Tal Chandwad, Dist. Nashik.

**Dr. Sadique Razaque**
Univ. Department of Psychology,
Vinoba Bhave University,
Hazaribagh, Jharkhand.

**Prof. Ram Nandan Singh**
Dept. of Buddhist Studies University of Jammu.

**Dr. Safiqur Rahman**
Assistant Professor, Dept. of Geography,
Guwahati College Bamunimaidam, Guwahati,
Assam.

PUBLISHED BY

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# १७. चर्मकार समाजातील शैक्षणिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ : अमरावती तालुका)

**प्रा. डॉ. सुभाष के. पवार**
सहयोगी प्राध्यापक, स्व. दत्तात्रय कला महाविद्यालय, नांदगाव पेठ, ता. जि. अमरावती.

**प्रस्तावना**

अमरावती जिल्हा हा नवरत्नांची खाण आहे. या भूमीत संत गाडगे महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, षिक्षणमहर्षी भाउसाहेब पंजाबराव देषमुख या कर्मयोग्यांचा जन्म झालेला आहे. षिक्षणाच्या क्षेत्रात या कर्मयोग्यांनी मोलाची शैक्षणिक भर घातलेली आहे. अमरावती जिल्ह्यात चर्मकार समाज बहुसंख्येने आढळून येतो. चर्मकार हा समाज बारा बलुतेदारांपैकी एक आहे. गाव गाडयातील इतर बलुतेदारांप्रमाणे या ही समाजाला एक स्वतंत्र पारंपारीक व्यवसाय आहे. विषेषतः शेतक–यांच्या शेती व्यवसायाला उपयुक्त असणारी चामडयाची अवजारे, चप्पल, जोडे, बुट, बैलांच्या गळयातील पट्टे आणि मोट तयार करुन देण्याची कामे त्या काळी चर्मकारांची असत. या मोबदल्यात शेतक–यांकडून वर्षाकाठी खळयावर सुगीच्या हंगामात त्यांना धान्य दिले जात असे. चर्मकार हा समाज हिंदू धर्म जाती व्यवस्थेमध्ये अस्पृष्य म्हणून गणला गेलेला समाज आहे. महाराष्ट्रात हा समाज चांभार किंवा चर्मकार या नावाने ओळखला जातो. कोकण भागात त्यांना चेवली व दाभोळी या नावाने ओळखल्या जाते संत रोहिदास हे चर्मकार समाजातील थोर संत म्हणून सर्वांना परीचीत आहेत.

**विषयाची निवड**

विदर्भातील अमरावती जिल्ह्यात चर्मकार समाज साधारणपणे इतर जिल्ह्याच्या तुलनेत अधिक संख्येने वसलेला आहे. स्वातंत्रोत्तर काळात भारत सरकारने सर्वांना न्याय मिळावा, सर्वांचा विकास व्हावा, सर्वांना समान संधी मिळावी, षिक्षणाची दारे सर्वांना खुली असावी असे धोरण स्विकारले आहे. चर्मकार समाजाचा विकास व्हावा या उद्देषाने त्यांच्या विकासासाठी शासना मार्फत काही योजना आखण्यात आल्या. उदा. मोफत षिक्षण, नौक–यांमध्ये आरक्षण, आर्थिक सवलती इत्यादी सोयी करण्यात आल्या. या सोयीचा लाभ या समाजाने कितपत घेतलेला आहे? याचा सकारात्मक व नकारात्मक परीणाम काय झाला. उद्योगांचे केंद्रीकरण झाले. औद्योगिकरणाचा वेग वाढला. शहरीकरण वाढत गेले दळण वळणाची साधने वाढली एकूणच या सर्व घडामोडींचा चर्मकार समाजावर किती परीणाम झाला, या परीणामातून त्यांचे कोणते प्रष्न सुटले? व कोणते निर्माण झाले. हे जाणून घेण्याचा उद्देषाने संषोधकाने "चर्मकार समाजातील शैक्षणिक समस्यांचे समाजषास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ अमरावती तालुका ) या संषोधन विषयाची निवड केली आहे.

**संशोधन पध्दती**

सदरील लघुशोध निबंधासाठी संशोधन पध्दतीतील प्राथमिक व द्वितीय सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. अमरावती तालुक्यातील एकुण 40 चर्मकार उत्तरदात्यांची निवड करुन त्यांची मुलाखत घेण्यात आली. प्राथमिक सामग्रीत मुलाखत अनुसूचीचा वापर करण्यात आला आहे. तसेच द्वितीय सामग्रीत विविध ग्रंथ, मासिके, वर्तमान पत्रे इत्यादी साहित्याचा वापर करुन तथ्य संकलन करण्यात आले आहे. तथ्य संकलनाच्या आधारे निष्कर्ष स्पष्ट करण्यात आले आहे.

**लघुशोध निबंधाची उदिष्टये:**

१. चर्मकार समाजातील शैक्षणिक जागृकता यांचा अभ्यास करणे.
२. चर्मकार समाजातील शिक्षणाचे प्रमाण याविषयी अध्ययन करणे
३. चर्मकार समाजातील शिक्षणातील शैक्षणिक गळतीचे प्रमाण याविषयी जाणुन घेणे.
४. शासनाच्या विविध योजनांचा चर्मकार समाजातील लोकांना कितपत लाभ झाला हे तपासणे.

**प्राप्त माहितीचे विश्लेषण**

शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे. शिक्षणामुळे व्यक्तिच्या व्यक्तिमहत्वाचा विकास साधल्या जातो. शिक्षण म्हणजे मानवाचा सर्वागिण विकास होय. सर्वागिण विकासात बौध्दिक, भावनात्मक अणि क्रियात्मक क्षेत्राचा समावेश असतो. या शिक्षणाची उद्दिष्टये म्हणजे सुशिक्षितपणा, सुस्कृत नागरिक तयार होणे व तो त्यादृष्टिकोनातून जीवनामध्ये यशस्वी झाला पाहिजे अशी समाजाची अपेक्षा असते. शिक्षण हे व्यक्तिच्या जीवन उपयोगासाठी महत्वाचे असते. प्रस्तूत संशोधन विषयाच्या अनुषंगाने एकुण 40 उत्तरदात्यांची नमुना म्हणून निवड करण्यात आली. सदर विषयाच्या अनुषंगाने त्यांच्याकडुन मुलाखत अनुसूचीद्वारे माहिती प्राप्त करण्यात आली आहे. चर्मकार समाजातील उत्तरदांत्याची शैक्षणिक माहिती सादर करण्यात आली आहे.

**सारणी क्र. 1**

**शैक्षणिक दर्जा दर्शविणारी सारणी**

| अ. क्र. | तपशील | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | प्राथमिक शिक्षण | 06 | 15.00 |
| 02 | माध्यमिक शिक्षण | 13 | 32.5 |
| 03 | उच्च माध्यमिक शिक्षण | 16 | 40.00 |
| 04 | पदवी | 03 | 7.5 |
| 05 | निरक्षर | 02 | 5.00 |
| 06 | एकूण | 40 | 100.00 |

सारणी क्र. 1 मध्ये, उत्तरदात्यांचे शैक्षणिक दर्जा याबाबत माहिती प्रस्तूत करण्यात आली आहे. सारणी वरुन असे स्पष्ट होते की, एकुण उत्तरदात्यांपैकी 06 उत्तरदाते हे प्राथमिक शिक्षण घेतले आहे. त्यांचे एकुण शेकडा प्रमाण 15 टक्के अतके आहे. माध्यमिक शिक्षण घेणारे 13 उत्तरदाते आहेत. त्यांचे एकुण शेकडा प्रमाण 32.5 टक्के इतके आहे. उच्च माध्यमिक शिक्षण घेणारे उत्तरदाते 16 आहेत. त्यांचे एकुण शेकडा प्रमाण 40 टक्के इतके आहे. पदवी

पर्यन्तचे शिक्षण घेणारे उत्तरदाते हे 03 आहेत. त्यांचे एकुण शेकडा प्रमाण 7.5 टक्के इतके आहे. आणि निरक्षर उत्तरदाते हे 2 आहेत. त्यांचे एकुण शेकडा प्रमाण 5 टक्के इतके आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की, बहुतांश उत्तरदात्यांच्या मते, जास्ती जास्त उत्तरदात्यांचा शैक्षणिक दर्जा उच्च माध्यमिक पर्यन्तचा आहे. त्यांचे एकूण शेकडा प्रमाण 40 टक्के इतके आहे.

**सारणी क्र. 2**

**शिक्षणाचे माध्यम दर्शविणारी सारणी**

| अ. क्र. | तपशील | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | मराठी | 36 | 90 |
| 02 | इंग्रजी | 04 | 10 |
| 03 | एकूण | 40 | 100.00 |

सारणी क्र. 2 मध्ये चर्मकार समाजातील उत्तरदात्यांचे शिक्षण कोणत्या माध्यमातून झाले याविषयी माहिती जाणुन घेतली असता असे दिसून येते की, एकुण उत्तरदात्यापैकी 36 उत्तरदात्यांचे शिक्षण मातृभाषेत म्हणजे मराठी या भाषेतून झाले आहे. त्यांचे एकुण शेकडा प्रमाण 90 टक्के इतके आहे. तर 04 उत्तरदात्यांचे शिक्षण इंग्रजी या भाषेतून झाले आहे. त्यांचे एकुण शेकडा प्रमाण 10 टक्के इतके आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की, बहुतांश उत्तरदात्यांच्या मते, त्याचे शिक्षण हे मातृभाषेतून म्हणजे मराठी या भाषेतून झाले आहे. त्यांचे एकुण शेकडा प्रमाण 90 टक्के इतके आहे.

**सारणी क्र. 3**

**शिक्षणात खंड पडला आहे काय? दर्शविणारी सारणी**

| अ. क्र. | तपशील | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 33 | 82.5 |
| 02 | नाही | 07 | 17.5 |
| 03 | एकूण | 40 | 100.00 |

सारणी क्र. 3 मध्ये, चर्मकार समाजातील उत्तरदात्याच्या शिक्षणात खंड पडला आहे काय? याविषयी माहिती जाणुन घेतली असता असे दिसुन आले की, एकुण उत्तरदात्यापैकी 33 उत्तरदात्यांनी होय असे म्हटले आहे. त्यांचे एकुण शेकडा प्रमाण 82.5 टक्के इतके आहे. तर 07 उत्तरदात्यांनी नाही असे म्हटले आहे. त्यांचे एकुण शेकडा प्रमाण 17.5 टक्के इतके आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की, बहुतांश उत्तरदात्यांच्या मतानुसार त्यांच्या शिक्षणात खंड पडलेला आहे. त्यांचे एकूण शेकडा प्रमाण 82.5 टक्के इतके आहे.

**सारणी क्र. 4**

**शिक्षणात खंड पडला आहे काय? दर्शविणारी सारणी**

| अ. क्र. | तपशील | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 01 | होय | 19 | 47.5 |
| 02 | नाही | 21 | 52.5 |
| 03 | एकूण | 40 | 100.00 |

सारणी क्र. 4 मध्ये चर्मकार समाजातील लोकांना त्यांच्या शिक्षणामध्ये शिष्यवृत्ती व आरक्षणाचा लाभ मिळाला काय? याविषयी माहिती जाणुन घेतली असता असे दिसुन आले की, एकुण उत्तरदात्यापैकी 19 उत्तरदात्यांनी होय असे म्हटले आहे. त्यांनी शिष्यवृत्तीचा लाभ घेतला आहे. त्यांचे एकुण शेकडा प्रमाण 47.5 टक्के इतके आहे. तर 21 उत्तरदात्यांनी नाही असे म्हटले आहे. त्यांचे एकुण शेकडा प्रमाण 52.5 टक्के इतके आहे.

यावरुन असे स्पष्ट होते की, चर्मकार समाजातील लोकांना जास्त प्रमाणात शिष्यवृत्ती व शिक्षणात आरक्षणाचा लाभ मिळालेला नाही.

चर्मकार समाजात उच्च व पदवी पर्यतंच्या शिक्षणाचे प्रमाण अत्यअल्प आहे. जास्ती जास्त उत्तरदात्यांचा शैक्षणिक दर्जा उच्च माध्यमिक पर्यन्तचा आहे. त्यांचे एकूण शेकडा प्रमाण 40 टक्के इतके आहे. 60 टक्के समाज हा उच्च शिक्षणापासून वंचीत आहे. तसेच त्याचे शिक्षण हे मातृभाषेतून म्हणजे मराठी या भाषेतून झाले आहे. त्यांचे एकुण शेकडा प्रमाण 90 टक्के इतके आहे. इंग्रजी माध्यमाचे प्रमाण कमी आहे. चर्मकार समाजातील शैक्षणिक स्थिती खुप चांगली नाही. त्यांच्या शिक्षणात मोठया प्रमाणात खंड पडलेला आहे. त्यांचे एकूण शेकडा प्रमाण 82.5 टक्के इतके आहे आणि चर्मकार समाजातील लोकांना जास्त प्रमाणात शिष्यवृत्ती व शिक्षणामध्ये आरक्षणाचा लाभ मिळालेला नाही.

**संदर्भग्रंथ सूची**


- अत्रे त्र्यंबक नारायण,''गावगाडा''मोटे प्रकाशन, दादर मुबई.तृतीय आवृत्ती 1959
- आगलावे प्रदिप,सामाजिक संशोधन पध्दती व तंत्रे,साईनाथ प्रकाशन,नागपूर. 2007.
- चव्हाण रामनाथ नामदेव ,जाती आणि जमाती,मेहता पब्लिषिंग हाउस, सदाषिव पेठ,पुणे. – 30, पहिली आवृत्ती – मार्च 1989
- बांदिवाडेकर / सहस्त्रबुद्धे ( संपा ) – विष्व चर्मकाराचे, ग्रथाली प्रकाषन, इंडियन एज्युकेषन सोसायटीची महात्मा फुले कन्या शाळा, बाबरेकर मार्ग, गोखले रोड, उत्तर दादर, मुंबई
- Acoff L. Russell,The Desigin of Social Research,The University of Chicago Press,Chicago (1961)

**Website**

- www.Google.com , B. www.shodhgnaga.co